**ठळक बातम्या**

- सर्वसामान्य नागरिकांचा रिझर्व बँकेवरचा दृढ विश्वास ही मौलिक ठेव असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- वक्फ सुधारणा विधेयकाचा हेतू कुणाची मालमत्ता जप्त करणं नसून न्याय सुनिश्चित करणं असा असल्याचं केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांचं स्पष्टीकरण
- नव्या आर्थिक वर्षाच्या आजच्या पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजारात तीव्र घसरण

**आणि**

- भारतीची हॉकीपटू  वंदना कटारिया आंतरराष्ट्रीय हॉकी सामन्यांमधून निवृत्त

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेशी सामान्य नागरिकांचा थेट संबंध येत नसला, तरी त्यांच्या सर्व आर्थिक देवाणघेवाणी रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येतात, त्यामुळे देशाच्या सर्व नागरिकांचा रिझर्व बँकेवरचा दृढ विश्वास ही मौलिक ठेव आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या स्थापनादिन सोहळ्याच्या समारोप कार्यक्रमात त्या मुंबईत बोलत होत्या. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताला जागतिक पातळीवर महत्त्वाचं स्थान मिळवून देण्यात आरबीआयनं महत्त्वपूर्ण भूमिका  निभावली असल्याचं त्या म्हणाल्या,

**होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

प्रचंड गरीबीपासून ते जगातल्या महत्त्वाच्या अर्थव्यवस्थांमधे स्थान मिळवणाऱ्या भारताचा संपूर्ण प्रवास रिझर्व्ह बँकेनं बघितला आहे. फसवणुकीच्या वाढत्या घटना, सायबर धोके याचा सामना रिझर्व्ह बँक तत्परतेनं करत असल्याचंही राष्ट्रपतींनी नमूद केलं.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्षपूर्तीनिमित्त विशेष ‘माय स्टॅम्प’चं अनावरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते यावेळी झालं.

बदलतं तंत्रज्ञान आणि जागतिक आर्थिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेकडून सातत्यपूर्ण नेतृत्व आणि दूरदृष्टीची अपेक्षा देशाला आहे, असं केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यावेळी म्हणाले. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनं आगामी दशक अतिशय महत्त्वाचं असून आर्थिक समावेशन, ग्राहक सुरक्षा आणि आर्थिक प्रगतीसाठी भारतीय रिझर्व्ह बँक वचनबद्ध आहे, अशी ग्वाही गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्वागतपर संबोधनात दिली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

वक्फ दुरुस्ती विधेयकाचा हेतू कुणाची मालमत्ता जप्त करणं नसून न्याय सुनिश्चित करणं हा आहे असं केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी स्पष्ट केलं. संसद परिसरात ते आज वार्ताहरांशी बोलत होते. या विधेयकाबाबत विरोधक अपप्रचार करत असल्याचं जोशी म्हणाले. भाजपा खासदार दिनेश शर्मा यांनीही विधेयकाचं समर्थन केलं. विधेयकाला विरोध करणारे राज्यघटनेच्या विरोधात आहेत असं शर्मा म्हणाले.

वक्फ दुरुस्ती विधेयकाबाबत सरकार अल्पसंख्यक समुदायाची दिशाभूल करत असल्याची टीका समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी केली. नोटाबंदी, जीएसटी आणि असेच इतर निर्णय घेऊन सरकार जनतेकडून सतत काहीतरी हिसकावून घेत असतं असं यादव म्हणाले. भाकप खासदार संदोष कुमार यांनीही विधेयकाला विरोध केला. या विधेयकातल्या काही तरतुदी असंवैधानिक असल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

विविध मुद्द्यांवर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ केल्याच्या पार्श्वभूमीवर लोकसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. खासदार रामजी लाल सुमन यांच्यावरल्या हल्ल्याचा मुद्दा समाजवादी पक्षाने शून्य प्रहरात उपस्थित केला. तर काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी नकली निवडणूक ओळखपत्रांच्या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरलं. यामुळे सभागृहात गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं.

विरोधी पक्षांनी मांडलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचना लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी फेटाळून लावल्या. तसंच सभागृहात फलक झळकावणं नियमाच्या विरोधात असल्याचं विरोधकांना सांगितलं. बिर्ला यांनी खासदारांना सभागृहात शांतता ठेवण्याचं आवाहन केलं. तरीही गोंधळ वाढतच गेल्यानं सभापतीनी सभागृहाचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब केलं.

**<><><><><>**

नक्षलमुक्त भारताच्या दिशेनं सरकार ठोस पावलं उचलत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. देशातली नक्षलग्रस्त जिल्ह्याची

संख्या बारावरुन ६ वर आण्यात सरकारला यश आल्याचं गृहमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे सांगितलं.

**<><><><><>**

चिलीचे अध्यक्ष गॅब्रीएल बोरिक फॉन्ट भारत दौऱ्यावर आले असुन यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत भेट घेतली.बोरिक त्यांची ही पहिलीच भारत भेट आहे. त्यांनी आज नवीदिल्लीत राजघाटावर जाऊन महात्मा गांधी यांच्या समाधीवर आदरांजली वाहिली. परराष्ट्र मंत्री डॉ. जयशंकर यांच्याशीही त्यांनी चर्चा केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सायंकाळी आयोजित केलेल्या भोजनसमारंभात अध्यक्ष बोरिक उपस्थित राहतील.

या दौऱ्यात गॅब्रीएल बोरिक मुंबई आणि बंगळुरू इथे भेट देऊन राजकीय नेते आणि उद्योजकांच्या भेटी घेतील.

**<><><><><>**

मुंबई होणाऱ्या वेव्हज् परिषदेच्या दरम्यान वेव्हज् बाजारचंही आयोजन केलं जाणार आहे. यात चित्रपट, टीव्ही, ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग आणि कॉमिक्स यासारख्या क्षेत्रातले दिग्गज एकत्र येणार आहेत. यात भागीदारी, व्यवसाय विस्तार यासारख्या गोष्टींवर चर्चा होईल. त्यासाठी प्रक्षेपण व्यवस्था, खरेदीदार - विक्रेते यांच्यातल्या बैठकांकरता जागा, आंतर-देशीय भागीदारी यासाठी सुविधा उपलब्ध असेल. www.wavesbazaar.com या संकेतस्थळावर याविषयी अधिक माहिती उपलब्ध आहे.

**<><><><><>**

नव्या आर्थिक वर्षाला आजपासून सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजारात तीव्र घसरण झालेली पहायला मिळाली. सकाळी बाजार सुरू झाल्यानंतर काही वेळातच मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजारांहून अधिक अंकांनी घसरला तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी तीनशेहून अधिक अंकांनी घसरला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प विविध कर आणि शुल्क लावण्याच्या घोषणा करत असल्याच्या पार्श्वभूमीवर तसंच जागतिक पातळीवर इंधन तेलांचे दर वाढत असल्यानं त्याचा एकंदर परिणाम भारतीय शेअर बाजारावर दिसून येत असल्याचं बाजार वर्तुळात बोललं जात आहे.

**<><><><>**

ई-स्पोर्ट्स हे एक उदयोन्मुख क्षेत्र असून या क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आज दिली. नवी दिल्लीत इथे भरणाऱ्या ई-स्पोर्ट्स कॉन्क्लेव्ह २०२५ या परिषदेचं उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झालं, तेव्हा त्या बोलत होत्या. भारताकडे या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी तंत्रज्ञान तसंच विशेष क्षमता असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. ई-स्पोर्ट्स या क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><>**

भारतीय महिला हॉकी खेळाडू वंदना कटारिया हिनं आंतरराष्ट्रीय हॉकी सामन्यांमधून अधिकृतरीत्या निवृत्ती जाहीर केली आहे.

वंदनाने आपल्या हॉकी कारकिर्दीची सुरुवात २००९ मध्ये केली होती. तेव्हापासून तिने ३२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधून १५८ गोल नोंदवले तसंच टोकियो ऑलिम्पिक मध्ये हॅट्ट्रिक करणारी ती पहिली भारतीय महिला हॉकी खेळाडू ठरली होती. तिला २०२१ मध्ये अर्जुन पुरस्कार तसंच धनराज पिल्ले पुरस्कार आणि २०२२ मध्ये पद्मश्री ने गौरवण्यात आलं होतं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंट्सचा सामना पंजाब किंग्जबरोबर लखनौ इथं होणार आहे.

काल मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं कोलकाता नाईट रायडर्स संघावर आठ गडी राखून विजय मिळवला. कोलकाता नाइट रायडर्स संघानं १७ षटकात ११६ धावा केल्या. विजयासाठीचं ११७ धावांच हे लक्ष्य मुंबईने दोन गड्याच्या मोबदल्यात केवळ १३व्या षटकातच पूर्ण केलं.

**<><><><><>**

हिरो आशिया चषक हॉकी स्पर्धा यावर्षी ऑगस्ट मध्ये बिहारमधे राजगीर इथं होणार आहे. या संदर्भात हॉकी इंडिया आणि बिहार राज्य क्रीडा प्राधिकरण यांच्यात पाटणा इथं सामंजस्य करार करण्यात आला. अलीकडेच बांधण्यात आलेल्या राजगीर हॉकी स्टेडियममध्ये २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत ही स्पर्धा होईल.

**<><><><><>**

भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विलियम्स हिनं भारताच्या अवकाश कार्यक्रमात योगदान देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. नासा इथं काल ती एका वार्ताहर परिषदेत बोलत होती. अंतराळातून भारत देशाचं झालेलं दर्शन आणि विशेषतः हिमालयाच्या पर्वतरांगांचं दृश्य फारच विलोभनीय होतं असं ती म्हणाली. गुजरात आणि मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यांवरच्या मच्छीमारी होड्यांचं दृश्य पाहून आपल्याला जणू घरीच आल्याचा भास झाल्याचं ती म्हणाली. आपण लवकरच भारतभेटीवर येणार असल्याचं तिने यावेळी सांगितलं.

//<><><><><>//